# वसई–विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर विभाग, मुख्यालय

दि.१३/०६/२०२४

**मालमत्ता कराचा भरणा लवकर करणाऱ्या मालमत्ता धारकांना महानगरपालिकेमार्फत मालमत्ता करामध्ये विशेष सवलत**

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत आहे कि, सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाची मालमत्ता कर देयके वितरणाची कार्यवाही सुरु असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरील मालमत्ता कर देयके पाहण्याची तसेच डाऊनलोड करण्याची सुविधा महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहेत. नागरिकांना मालमत्ता कराचा ऑनलाईन पद्धतीने (गुगल पे, फोन पे, पे.टी.एम., नेट बँकिंग इत्यादी) भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुदतीत मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करातून महानगरपालिकेमार्फत विशेष सूट जाहीर करण्यात आलेली आहे ती खालीलप्रमाणे :

| सूटचा तपशील | |
|---|---|
| कालावधी | सूटचा दर (सामान्य करात) |
| ०१जून २०२४ ते ३० जून २०२४ पर्यंत | ५ % |
| ०१ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत | ३ % |

तरी सर्व मालमत्ता धारकांनी वरील सवलतीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपल्या मालमत्ता कराचा भरणा करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

मालमत्ता कर विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका